# ज्योतिर्मय

साहित्याचे विद्यापीठ

Online Journal of Literature....

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक १०५ वा ❑ भारतीय सौर दिनांक १४ ज्येष्ठ शके १९४८, गुरूवार दि.०४ जून २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)

## विशेष लेख...

## मृत्यूचा सापळा: विषारी दारूच्या विळख्यात अडकतेय युवा पिढी

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

विषारी दारूचे वाढते प्रमाण अत्यंत चिंताजनक आहे. महाराष्ट्रात (विशेषतः पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात) बनावट दारूत मिथेनॉल सारखे विषारी रसायन मिसळल्याने अनेक निष्पाप लोकांचे बळी गेले आहेत. या अवैध धंद्यांमुळे अनेक कुटुंबे उद्ध्वस्त होत आहेत.

महाराष्ट्र आणि परिसरातील युवा पिढी विषारी व केमिकल दारूच्या (उदा. नुकत्याच पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये घडलेल्या घटना) गंभीर विळख्यात अडकत आहे. घातक रसायने आणि स्पिरिटच्या वापराने बनवलेली ही अवैध दारू युवा पिढीसाठी 'मृत्यूचा सापळा' ठरत असून, अवघ्या काही तासांत अनेकांचे बळी जात आहेत.

ग्रामीण व शहरी भागातील झोपडपट्ट्यांमध्ये अवघ्या ३० ते ५० रुपयांत मिळणाऱ्या गावठी आणि हातभट्टीच्या दारूच्या आहारी तरुण वर्ग जात आहे.

नशा जास्त करण्यासाठी आणि स्वस्त दारू बनवण्यासाठी इथेनॉलऐवजी घातक मिथेनॉलचा वापर केला जातो. हे शरीरात फॉर्मिक ॲसिडमध्ये बदलते, ज्यामुळे यकृत, किडनी आणि मेंदू निकामी होतात.राज्यातील घटना: नुकत्याच पुणे आणि पिंपरी-चिंचवड भागात घडलेल्या विषारी दारूकांडात २४ हून अधिक जणांचा मृत्यू झाला आहे. पुणे पिंपरी चिंचवड घटनेने संपूर्ण राज्य हादरले असतानाच चांदुर रेल्वे पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या कौरखेडा येथील एका मोकळ्या जागेत सुरू असलेल्या बेकायदेशीर विषारी गावठी दारूच्या अड्ड्यावर पोलिसांनी कारवाई केली आहे ही दारू पिल्याने पिकांची प्रकृती अत्त्यवस्थ असल्याची बातमी समोर आली आहे.

पुण्यातील भीषण घटनेचे पडसाद राज्यभर उमटत आहेत. नागपूर जिल्ह्यातही अवैध दारू विक्रीच्या अड्ड्यांवर पोलिसांनी मोठी मोहीम उघडली आहे. नागपूर शहर आणि ग्रामीण भागातील ४३ ठिकाणी धाडी टाकून ५६ आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. हिंगणा, कामठी, कोराडी आणि एमआयडीसी भागात या कारवाई केल्या जात आहेत.

तसेच नागपूर शहर पोलिसांनी तहसील ठाण्याच्या हद्दीतील टिमकी परिसरातून आणि गिट्टीखदान परिसरातून महिला आरोपींना अटक केली आहे. या मोहिमेत मोठ्या प्रमाणावर गावठी व देशी दारूचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. मात्र, पुण्यासारखी मोठी दुर्घटना घडल्यानंतरच पोलिसांना जाग येते का? असा संतप्त सवाल आता सर्वसामान्य नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.

विषारी दारू पिण्याचे प्रमाण का वाढत आहे,हा प्रश्न उपस्थित होत आहे.

नफ्याचा हव्यास, दारूची किक (नशा) वाढवण्यासाठी घातक रसायनांचा (उदा. मिथेनॉल) वापर आणि परवाना नसलेल्या गावठी दारूच्या अवैध व्यवसायामुळे विषारी दारू तयार होण्याचे प्रमाण वाढत आहे.जास्त नफा मिळवण्यासाठी अवैध दारू विक्रेते मूळ घटकांऐवजी अत्यंत स्वस्त असलेल्या मिथेनॉलचा वापर करतात.गूळ, युरिया किंवा इतर रसायने वापरून गावठी दारू बनवताना चुकीच्या प्रक्रियेमुळे त्यात विषारी अल्कोहोलचे प्रमाण वाढते. आर्थिक परिस्थिती कमकुवत असलेले लोक ''स्वस्तात मिळतंय'' म्हणून परवाना नसलेल्या हातभट्टीची किंवा गावठी दारू खरेदी करतात, जी अनेकदा बनावट आणि विषारी असते.अनेक भागांत छुप्या पद्धतीने चालणाऱ्या अवैध दारू अड्ड्यांवर वेळेवर कारवाई होत नाही, ज्यामुळे या व्यवसायाला प्रोत्साहन मिळते.

विषारी दारूचे सेवन हे मानवी आरोग्यासाठी अत्यंत घातक आणि जीवघेणे ठरते. पुण्यात नुकत्याच घडलेल्या विषारी दारूकांडात अनेकांचे बळी गेले आहेत. यासारख्या घटनांमुळे अनेक कुटुंबे उद्ध्वस्त होतात आणि सामाजिक स्वास्थ्य बिघडते. त्यामुळे या काळ्या धंद्याला आळा घालण्यासाठी प्रशासकीय आणि कायदेशीर पातळीवर कठोर कारवाई करणे ही काळाची गरज बनली आहे.

गावोगावी आणि शहरांमधील झोपडपट्ट्यांमध्ये राजरोसपणे चालणाऱ्या हातभट्ट्या पूर्णपणे उद्ध्वस्त केल्या पाहिजेत. विषारी रसायने (उदा. मिथेनॉल) वापरून होणारी दारू निर्मिती रोखण्यासाठी नियमित तपासणी मोहीम राबवणे गरजेचे आहे.

केवळ हातभट्टी चालकांवर नव्हे, तर या अवैध धंद्यामागे असणारे मुख्य सूत्रधार, पुरवठादार आणि त्यांना पाठीशी घालणारे भ्रष्ट अधिकारी यांच्यावरही कठोर गुन्हे दाखल झाले पाहिजेत.

स्थानिक पोलिस, राज्य उत्पादन शुल्क विभाग आणि महसूल विभागाने अधिक सतर्क राहून अवैध दारू विक्रीची साखळी शोधून काढली पाहिजे. अशा धंद्यांना मिळणारे राजकीय किंवा अन्य संरक्षण नष्ट करणे आवश्यक आहे.

सामान्य जनतेमध्ये विषारी आणि बनावट दारूच्या दुष्परिणामांबद्दल जनजागृती निर्माण केली पाहिजे. तसेच, व्यसनाधीन झालेल्या तरुणांसाठी पुनर्वसन केंद्र सुरू करणे आणि समुपदेशन करणे गरजेचे आहे.विषारी दारूचे जीवघेणे व्यसन रोखण्यासाठी सामाजिक प्रबोधनासोबतच अवैध दारू विक्रेत्यांवर कडक कायदेशीर कारवाई होणे अत्यंत गरजेचे आहे.

# संघ शिक्षा वर्गात रक्तदानाचा यज्ञ; २३ स्वयंसेवकांचे रक्तदान

## डॉ. हेडगेवार रक्तकेंद्राचा उपक्रम; वर्गकाळात ३ हजार सीड बॉल्सचीही निर्मिती

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

सोलापूर – राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या संघ शिक्षा वर्गाच्या सांगता समारंभाचे औचित्य साधून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. हेडगेवार रक्तपेढीच्या वतीने राबवण्यात आलेल्या या उपक्रमात २३ स्वयंसेवकांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. स्वयंसेवकांमध्ये रक्तदानाचे महत्त्व रुजावे, या उद्देशाने हा कृतिशील उपक्रम हाती घेण्यात आला होता.

सोलापूरच्या हरिभाई देवकरण प्रशालेत पश्चिम महाराष्ट्र प्रांताचा हा संघ शिक्षा वर्ग ३० मे रोजी संपन्न झाला. १५ दिवस चाललेल्या या वर्गाच्या समारोपप्रसंगी वैद्यकीय निकषांनुसार पात्र ठरलेल्या स्वयंसेवकांनी रक्तदान केले. डॉ. हेडगेवार रक्तकेंद्राचे डॉ. श्याम गायकवाड, रवी कोटा, रुपाली लोंदे, समर्थ कोळी, राहुल मस्के आणि मोहन कर्वे यांनी या शिबिराचे नेटके संयोजन केले.

**विविध सामाजिक उपक्रमांवर भर**

१५ दिवसांच्या वर्ग कालावधीत विविध सामाजिक उपक्रमांचेही आयोजन करण्यात आले होते. याद्वारे सामाजिक समरसता, कुटुंब प्रबोधन, पर्यावरण संवर्धन, स्वबोध आणि नागरी कर्तव्ये या मूल्यांचे संस्कार स्वयंसेवकांवर करण्यात आले. याचाच एक भाग म्हणून पर्यावरण रक्षणासाठी स्वयंसेवकांनी वर्गकाळात ३,००० पेक्षा जास्त सीड बॉल्स (बियांचे गोळे) तयार केले असून, आगामी पावसाळ्यात त्यांचे रोपण करण्यात येणार आहे.



# उन्हाचा कहर......

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

'उन्हाचा वणवा जाईना समद्या जीवाची होतेय दैना' 'आपुलं आरोग्य आपुनचं जपायानां'

दरवर्षी मई महिना लई कडाक्या उन्हाचा समजल्या जातुयां बरं नि मग या महिन्याच्या सरत्या आठड्यास्नी धडामधुम विजांचा कडकडाटानं काळकुट्ट ढग जमा होऊनशानं वार वावधानं सुटूनि ढग फुटूनि नादरवाणी कसा पाऊस पडाया लागतोय बरं तवा बर वाटाया लागते की, का तर समदं वातावरण कस ठंड ठंड होतय. गरमी उकाड्यान अंग समद भाजुन निघतय ते पण कमी होऊन माणसं बायाबापड उन्हाच्या कडाक्यापासून सुसज्ञकारा सोडाया लागताय नि आठच दिवसात म्होर पावसाळा सुरु होऊन समद कस गार गार होऊनि पाऊस पडतोय पेरण्यासाठी शेतकरी सज्ज होऊन पावसात आनंदी आनंदी हुतोय.




पर आवंदा तर कठीन झालय बघा. मे महिना संपत काय संपलाय, जुन सुरु झालाय. एकही पाऊसाचा पत्ता नाय. काय कराव वातावरण कठीण झालयं कडाक्याच्या वणव्यांनं अंगाची लाईलाई होतेय. काही दुखण्यांनी नको त्या अजगरासारख डोक वर काढलय की, कुणाच्या घरामंदी एक तरी लहान लेकरु, वयस्क माणसं, गरोदर बाई तापान म्हणा पलंगावरी, खाटीवरी फणफणतयं. काई व्यक्ती म्हणं की, पांढऱ्या पेशी कमी झाल्या की ज्यादा झाल्या की यामुळे थकवा आलाय की चालता चालता तोल जाऊन खाली पडतोय की कायं अस बाया माणसास्नी झालय बघा.

दोन-चार दिस बाहेरगावास्नी उन्हात तान्हात दुचाकीवर फिरलाय, उनहाचा तडका बसलाय की, घरी पलंगावर लोळत पडलाय, अर काय झालय काहीचच सुधराना बुवा. अंगावर हात ठेवलाय तर ताप वाढलाय. तो पण लई कडक, दवाखान्यास्नी नेल तर कधी नांव नाय ऐकत म्हण उस्माघात झाला. ताप डोक्यापर्यंत गेलाय. घ्या कंट्रोल झालाय तर ठिक तवा मेंदुत ताप श्रिन जीव जगण्याची सुतराम शक्यता नाय. असं डॉक्टर म्हणत या. घ्या बोंबला गरीबास्नी करायच काय. कडक वणव्यान काम मिळत नाय. खेडयापाड्यात तर कामधंद्याची लई परेशानी हाय तवा या उस्माघात नामाकरण रोग्यानं वर नागासारखा ची फणा काढलाय ना मंडळी. लहान लेकरु, लेकीचं तर लई हाल हुताय बरं. तवा लेकरास्नी चांगला

पाऊस पडोस्तर बाहेरगावी नेऊच नका ना. तुमी पण फिरच नका. आजकाल बघ्याच नवीन लगीन जोडपी उन्हातान्हां एकदोन दिवस हशीखुशीनं फिरायास निघत आहे. पर दुसरं तिसरं दिनी ते दोघंही बीमार पडत हाय, काय म्हणावे यास्नी. तवा तरुण-तरुणींनी, नवविवाहीत जोडपे यास्नी फिरायच कशाला ? ७ जुनला पावसाळा नाही, आता ११ किंवा १२ जुनला सुरु होतोय म्हणे अस तज्ञ जाणकार, भाकीतकार, भविष्यकार यांच म्हणणे आहे अस ऐकास्नी मिळतय बघा. वातावरण किती बदललयं माणसांचा जीव घेऊ पाहतय की काय अस झालयं. आहो साहजिक हाय कलियुग सुरु झालयं. या कलियुगात तर माणस बदलली, नियत-न्यात ठिकाणावर नाय. रायली तर शेवटी तो निसर्ग हाय. निसर्गचक्र थोडफार बदलणारच. मागु पुढे ऋतूचक्र होतयं. आपुण समदिसनं अनुभव होतोयच की, मात्र या बदलाचा फटका माणसाला बसतोय व नको त्या अडचणींचा, समस्यांचा, रोगांचा झटका माणसाला निसर्गचक्र देऊन जातोय. तवा समद्यास्नी सांगण की, अजून उन्हाचा कडाका जोराचा हाय.

पाऊस कधी पडणार याचा भरोसा नाय. तुम्ही खेड्यातमंदी जा की, शहरात जा समदीकडे उन्हाचा पारा वाढता हाय. गर्मीना तर उच्चांग काढलाय. कुठे ४५ ते कुठे ४७ पर्यंत डिग्री सेल्सीयअस कडकाच्या पारा वाढलायं. म्हणजे हे तर जीवाच्यावर अति झालय ना. तवा का नाही रोगं वाढतीलच ना. तवा पाऊस पडेस्तूर माहं म्हणणय की, उन्हा-तान्हात फिरच नका ना. तुम्ही तुमची काळजी व काही खानपान पाळा. या समस्या रोगास्नी टाळा. तवा म्हणतोय की, उन्हाचा वणवा जाईना-समद्या जीवाची होतेय दैना. आपुलं आरोग्यास्नी आपुनचं जपायनां.



मल्हारराव नाचण डोणगांवकर
मुक्त पत्रकार, छत्रपती संभाजीनगर
मो. ९२२५५६७५४२

# पुणे मेट्रोतील कंत्राटी कामगारांना केंद्रीय वेतनश्रेणी लागू करण्याचा निर्णय, भारतीय मजदूर संघाच्या संघर्षाला मोठे यश

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**




पुणे – पुणे मेट्रो रेल प्रकल्पामध्ये कार्यरत असलेल्या हजारो कंत्राटी कामगारांच्या न्याय्य वेतनाच्या मागणीस अखेर यश मिळाले असून महाराष्ट्र राज्याचे मा. कामगार मंत्री ना. आकाश फुंडकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत पुणे मेट्रोतील सर्व कंत्राटी कामगारांना केंद्रीय वेतनश्रेणीनुसार वेतनवाढ लागू करण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला. या निर्णयामुळे कामगारांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून हा भारतीय मजदूर संघाच्या सातत्यपूर्ण आणि संघर्षशील प्रयत्नांचा मोठा विजय मानला जात आहे.

पुणे मेट्रो रेल कामगार संघ (संलग्न भारतीय मजदूर संघ) यांनी गेल्या अनेक महिन्यांपासून कंत्राटी कामगारांना न्याय्य वेतन मिळावे, केंद्र शासनाच्या लागू असलेल्या वेतनश्रेणीनुसार वेतन देण्यात यावे तसेच विविध प्रलंबित प्रश्न सोडविण्यात यावेत यासाठी सातत्याने पाठपुरावा केला होता. यासाठी शासन, कामगार आयुक्त कार्यालय, पुणे मेट्रो प्रशासन तसेच संबंधित कंत्राटदार यांच्याशी अनेक बैठका, निवेदने व चर्चा करण्यात आल्या.

या आंदोलनाचा निर्णायक टप्पा म्हणून दि. १६ एप्रिल २०२६ रोजी भारतीय मजदूर संघाच्या नेतृत्वाखाली मुंबई येथे भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. या मोर्चामध्ये राज्यभरातील मोठ्या संख्येने कामगारांनी सहभाग घेतला होता. या व्यापक आंदोलनामुळे शासनाचे लक्ष या गंभीर प्रश्नाकडे वेधले गेले आणि त्यानंतर झालेल्या सकारात्मक चर्चांमधून आजचा ऐतिहासिक निर्णय शक्य झाला.

बैठकीदरम्यान केवळ वेतनवाढीच नव्हे तर थकीत वेतन फरकाची रक्कम (), वैधानिक सुविधांची अंमलबजावणी, कामगारांच्या सेवा अटी तसेच इतर प्रलंबित प्रश्नांबाबतही सकारात्मक चर्चा झाली. संबंधित प्रश्नांवर लवकरच कार्यवाही करण्यात येणार असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.

कामगारांच्या न्याय्य मागण्यांबाबत सकारात्मक भूमिका घेतल्याबद्दल आणि प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घेतल्याबद्दल पुणे मेट्रो रेल कामगार संघ व भारतीय मजदूर संघाच्या वतीने महाराष्ट्र राज्याचे मा. कामगार मंत्री ना. आकाश फुंडकर यांचे आभार व्यक्त करण्यात आले.

या बैठकीस भारतीय मजदूर संघाचे अखिल भारतीय सचिव श्री. अनिल ढुमणे, महाराष्ट्र प्रदेश महामंत्री श्री. किरण मिलगीर, पुणे जिल्हाध्यक्ष श्री. अर्जुन चव्हाण, पुणे मेट्रो रेल कामगार संघाचे अध्यक्ष श्री. राम सुरवसे, सौ. निकिता दंडवते, कैलास मोरे , महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाचे अध्यक्ष श्री. निलेश खरात, श्री. उमेश विश्वाद तसेच , पुणे मेट्रोतील कामगार पदाधिकारी उपस्थित होते . या बाबतीत पुणे मेट्रोतील सर्व कामगारांनी संघटित होऊन संघर्ष केला अशीच एकजूटीने पुढील काळात नोकरीत कायम सेवेत सामावून घेण्या बाबतीत प्रयत्नशील राहणार आहेत असे मनोगत अखिल भारतीय ठेका मजदूर महासंघ सरचिटणीस व पुणे मेट्रो रेल कामगार संघ जनरल सेक्रेटरी सचिन. मेंगाळे यांनी व्यक्त केले आहे . भारतीय मजदूर संघाच्या नेतृत्वाखाली कामगारांच्या हक्कांसाठी सुरू असलेला हा संघर्ष पुढेही अधिक ताकदीने सुरू राहील, असे असा विश्वास सचिन मेंगाळे यांनी व संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

